# प्रधानमंत्री पिक विमा योजना (प्र. पि. वि. यो.)

## योजने संबंधी

**इ) योजनेचा उद्देश**

प्रधानमंत्री  पिक विमा योजना (प्र. पि. वि. यो.) हिचा उद्देश कृषी क्षेत्रातील उत्पादन कायम राखण्यासाठी मदत करणे हे आहे ज्यात -

1) आकस्मिक घटनेमुळे ज्या शेतक-यांच्या पिकाचे नुकसान हानी झाली आहे अशाना आर्थिक मदत प्रदान करणे.

ब) शेतक-यांचे शेतीतील सातत्य टिकुन रहण्यासाठी त्यांचे उत्पन्न स्थिर करणे.

क) कृषी क्षेत्रातील नवीन व अत्याधुनिक पध्द्तींचा अवलंब करण्यासाठी शेतक-यांना उत्तेजन देणे.

ड) पतपुरवठ्याचा ओघ कृषी क्षेत्रात रहाणे सुनिश्चित करणे; ज्यामुळे अन्नधान्य सुरक्षेस हातभार लागेल व शेतक-यांची प्रगती होईल, तसेच उत्पादनातील जोखीमीपासून शेतक-यांचे संरक्षण करण्याव्यतिरिक्त कृषी क्षेत्रामध्ये पिकांची विविध लागवड आणि गुणवत्ता तसेच स्पर्धात्मकता वाढवणे.

* ही योजना ज्या पिकांची मागील उत्पन्नाची आकडेवारी उपलब्ध आहे आणि ज्यांवर सामान्य पिक अंदाज सर्वेक्षणचा (GCES) एक भाग म्हणून आवश्यक ते पिक कापणी प्रयोग (CCEs) झालेले आहेत अशा सर्व प्रकारची अन्नधान्य व गळीत पिके तसेच वार्षिक नगदी पिकांचा अन्तर्भाव करते.

* ही योजना अधिसूचित पिकांकरिता पिक कर्ज घेतलेल्या कर्जदार शेतका-यांसाठी / कि क्रे का (KCC) खातेदारांसाठी अनिवार्य आहे. तथापि ही योजना इतर / बिगर कर्जदार शेतका-यांसाठी ऐच्छिक आहे.

* सर्व खरीप अन्नधान्य आणि गळीत पिकांसाठी शेतक-यांकडून कमाल देय अधिमूल्य 2%, रब्बी आणि गळीत पिकांसाठी 1.5%, तसेच वार्षिक नगदी पिकांसाठी 5% आहे.

* अधिमूल्य व विमा शुल्क दर यातील शेतका-यांना द्यावा लागणारा फरक हा केंद्र तसेच राज्य शासन समसमान वाटून घेतील.

* हंगामी पध्दती ह्या कर्जदार व बिगर - कर्जदार शेतका-यांसाठी एकच असतील.

## प्र. पि. वि. यो. अंतर्गत यश

आम्ही प्र. पि. वि. यो. ह्या योजनेत रब्बी 2016-17 पासून सहभागी आहोत ज्यात देशातील निवडक राज्ये समाविष्ट केलेली आहेत.

| मोसम | राज्य |
|---|---|
| | |
| रब्बी 2016-17 | आसाम |
| | महाराष्ट्र |
| | ओड़ीशा |
| | बिहार |
| खरीप 2017 | ओड़ीशा |
| | वेस्ट बंगाल |
| | तेलंगना |
| | महाराष्ट्र |
| रब्बी 2017-18 | अंदमान आणि निकोबार |
| | महाराष्ट्र |
| | आंध्र प्रदेश |
| | मणिपुर |
| | ओड़ीशा |
| खरीप 2018 | तेलंगना |
| | आंध्र प्रदेश |
| | आसाम |
| | अंदमान आणि निकोबार |
| | मणिपुर |
| | पोंडेचरी |
| | |

हंगमाकारिता ज्या पिकांचा विमा उतरविण्याचा असेल त्यांचे मूल्यनिर्धारण आमच्या कंपनीच्या विमाशास्त्रज्ञ (**Actuary**) विभागकडून केले जाईल.

**सामान्य व्यवस्थापन**

आमच्या क्षेत्रातील कार्यालयात नोंदणी व दावा भरपाई यांचा दैनंदिन आढावा घेतला जातो. योजनेच्या अंमलबजावणीकारिता प्र. पि. वि. यो. च्या क्रियात्मक मार्गदर्शन तत्वानुसार बँक व सामान्य सेवा केंद्र (CSC) बरोबर नियमित पाठपुरावा केला जातो.

## संपर्काकरता -

**चंद्रकांत लोहार**

**प्रबन्धक,**

**नेशनल इन्शुरेंस कंपनी लिमिटेड,**

**पुणे क्षेत्रीय कार्यालय,**

**4 था मजला, भाऊसाहेब शिरोले भवन,**

डेक्कन जिमखाना, पुणे 411 004.
फोन नंबर - 020 25531376, 25531859.